# TickMark.Ai
Mumbai

**Class:** EM - CLASS 10 | **Subject:** Marathi | Time: 1 hr
**Date:** 15-05-2025 | **Paper:** Weekly Test (Solution) | **Marks:**40

**1)**
**(1)** (i) तरुण x म्हातारा
(ii) तहान x भूक

**2)**
**(1)** (i) पान – पर्ण
(ii) पक्षी – खग, विहंग

**3)**
**(1)** (1) ठसा - ठसे (2) शेंग - शेंगा

**4)**
**(1)** (i) उंदीर - पुल्लिंग
(ii) पंखा - पुल्लिंग

**5)**
**(1)** प्रश्नार्थी वाक्य

**6)**
**(1)** मुले कबड्डी खेळून घामाघूम होतात.

**7)**
**(1)** ही कल्पना वाईट नाही

**8)**
**(1)** "अरे, पण शास्त्रीय सत्य आहे'

**9)**
**(1)** आमचे मूळ गाव दक्षिण गोव्यातील माशेल.

**10)**
**(1)** गाणी गाणारा - गवई / गायक

**11)**
**(1)** ज्ञानपीठ

**12)**
**(1)**

**13)**
**(1)** रोजच्याप्रमाणे गौतम सकाळीच उठला. त्याची रोजची दैनंदिन कामे उरकुन तो शाळेत जात असे. गौतम अनाथ होता त्यामुळे त्याला स्वतः काम करून शिकवणीसाठी पैसे गोळा करावे लागत होते. गौतम वर्तमानपत्र वाटपाचे काम करत असे. ते काम उरकून मग तो शाळेत जात असे. एकेदिवशी शाळेत जाता जाता त्याच्या पायाखाली काहीतरी वेगळीच वस्तू आली असे त्याला जाणवले. त्यांनी वाकून पाहिले तर ते पैशाचे पाकीट होते. त्याने आश्चर्याने आणि घाबरून ते पाकीट उचलले . कुणालाही काही न बोलता तो शाळेत हजर झाला. शाळा सुरू झाली पण त्याचे मन बेचैन होते ही गोष्ट वर्ग शिक्षकांच्या नजरेत आली. त्यांनी त्याला विचारल्यावर गौतमने पैशाचे पाकीट वर्गशिक्षकांना दाखविले. वर्गशिक्षकांनी पाकीट उघडल्यावर त्यात त्या व्यक्तीचा पत्ता तसेच नाव होते. वर्गशिक्षकांनी पाकिटातील सर्व माहिती पोलिसांना दिली.

दोन दिवसांनी एक तरूण ते पाकीट नेण्यास आला . पुरावे आणि ओळखपत्र दाखवून त्यांनी पाकीट आपल्या ताब्यात घेतले ते पाकीट बघून त्याचा आनंद गगनात मावेना. कारण त्या पाकिटामध्ये अति महत्त्वपूर्ण कागदपत्रे होती. त्याला गौतम बद्दल समजल्यावर त्याने त्यास बक्षीस दिले आणि त्याच बरोबर त्याचे शिक्षण पूर्ण होण्यासाठी संपूर्णतः मदत करण्याची जबाबदारी पण घेतली.

TickMark.Ai

तात्पर्य : प्रामाणिक पणाचे फळ सदैव चांगलेच असते.

**14)**
**(1)**

**15)**
**(1)** दिनांक 6 सप्टेंबर
आमच्या वार्ताहरा कडून

दिनांक 6 सप्टेंबर: 5 सप्टेंबर या दिवशी स्वतंत्र भारताचे पहिले उपराष्ट्रपती आणि दुसरे राष्ट्रपती यांच्या जन्मदिनी सर्व भारतामध्ये शिक्षक दिन साजरा केला जातो शिक्षक दिनाचे औचित्य साधून पाच सप्टेंबर रोजी पुणे येथील श्री शिवाजी महाविद्यालयात शिक्षक दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी शिक्षक दिवस हा मोठ्या उत्साहात साजरा केला.

शिक्षक दिन या कार्यक्रमाची रूपरेषा विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने आखली. व कार्यक्रम योग्यरीत्या पार पाडला.दुपारच्या सुट्टीनंतर विद्यालयाच्या सभागृहांमध्ये शिक्षक दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनींनी गायलेल्या स्वागत गीताने झाली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि अध्यक्ष आणि इतर शिक्षकांना शाल आणि श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

शिक्षक दिनानिमित्त शाळेचे मुख्याध्यापक आणि कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी शिक्षकाचे महत्त्व समाजात असलेली शिक्षकाची गरज या विषयी भाषणे दिली.

शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रमाचे कार्यक्रमांमध्ये भाषण स्पर्धा सुद्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये विविध वर्गातील विद्यार्थी विद्यार्थिनींनी आपापले भाषणे सादर केली. भाषण स्पर्धेनंतर विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस आणि प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या सन्मान करिता त्यांना पुष्पगुच्छ दिले आणि त्यांचे आभार मानले आणि सर्वात शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन घेण्यात आले आणि कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

**16)**
**(1)** **पुस्तकाचे आत्मवृत्त**

एकदा सकाळी उठण्यास फारच वेळ झाळा. मन आळसावले होते. अभ्यासाचा खोलीत जाऊन नुसताच टेबला जवळील खुर्चीवर बसलो होतो. टेबलावर पुस्तके अस्ताविस्तपणे पडली होती. मी मनामध्ये कांही विचारकरीत होतो. तोच माझ्या कानांवर कांही शब्द पहले अरे नुसताच काय बसतोस या पुस्तकांच्याकडे बघता हल्ली बरीच पुस्तके तु हातात घेतोस आणि ठेवून देतोस. मलाही तसेच करतोस. आमचा तुला कंटाळा आला आहे काय? या शब्दानी मी भानावर आलो. पाहतो तर इतिहासचे पुस्तक माझ्याशी चक्क बोलत होते. ते सांगत होते कि माझा जन्म एका नामवंत इतिहास संशोधकांच्या घरी झाला. त्यामुळे माझी किंमत वाढलेली होती. त्यामुळे मला खूप मागणी होती. मी अनेकांच्या घरी होते. माझी ज्ञानी माणसांबरोबर मैत्री झाली. मी सर्वांना खूप आवडत होते. माझा या सर्व लोकांना खूप उपयोग होत होता. त्यांच्या ज्ञानामध्ये खूप मोठी भर पडत होती माझ्यामध्ये खूप संशोधनाची माहिती असलेले सर्वजण माझा वारंवार उपयोग करून घेत होते. इतर पुस्तकापेक्षा मला जरा जास्त मान मिळत होता.

आता पुस्तकांचे स्वरूप बदलत चालले आहे. नवीन डिजीटल तंत्रज्ञानामुळे संगणकावरच बरीच पुस्तके उपलब्ध होतात. त्यामुळे पुस्तकांचा वापर कमी होत चालला आहे. हा वापर कमी झाल्यामुळे बरे वाटते कारण आम्हाला वाचण्यासाठी सारखे हातात घेवून घेवून आम्हाला फाडून टाकले जाते. आमच्याकडे कोणी लक्षपण फारसे देत नाही. त्यामुळे आम्हाला आता थोडा आराम मिळतो. याचा आनंद आहे अरे पण हा आनंद जास्त काळ टिकणार नाही. कारण जर सर्व पुस्तके संगणकावर उपलब्ध झाली तर पुस्तकाला मागणी कमी होणार त्यांची छपाईकमी होणार. बाजारात पुस्तके मिळणार नाहीत. मग गरीबाती काय करावयाचे? त्यांना संगणक घेणे परवडणार नाही आणि ते चांगल्या ज्ञानापासून वंचित राहतील याची खंत वाटते. दारावरील टकटकीने मी भानावर आलारे. दारात आई चहाचा कप घेवून उभी होती. मी चहा घेवून पुस्तकाचा विचार करत असता पुस्तकाचे म्हणणे बरोबर आहे. याचा आपण विचार केला पाहिजे असे वाटले.

All the Best

TickMark.Ai